

३

# ।। श्रीराम तो मी ।।

**राम: शस्त्रभृतामहम।**

**– श्रीमदगीता ज्ञानेश्वरी अ. १०, श्लोक, ३१, प्रथम चरण, उत्तरार्ध**

**शस्त्रधरां समस्ता– माजी श्रीराम तो मी।।२५१।।**

**जेणे साकडलिया धर्मांचे कैवारे।**
**आपणपे करूनी धनुष्य दुसरे।**
**विजयलक्ष्मीये एकमोहरे। केले त्रेती।।२५२।।**

**पाठी उभे ठाकुनी सुवेळी।**
**प्रताप लंकेश्वराच्या सिसाळी।**
**गगनी उदो म्हणतया हस्तबळी।**
**दिधली भूता।।२५३।।**

**जेणे देवांचा मानु गिवसिला।**
**धर्मासी जिर्णोद्धार केला।**
**सूर्यवंशी उदेला।**



**सूर्य जो का ।।२५४।।**

**तो हतियेरू परजितया आतु।**
**रामचंद्र मी सिताकांतु...।।२५५।।**

उखळू गावच्या समस्त भक्तभाविकांना ह. भ. प. दिनकरचे सप्रेम नमस्कार. आपल्या पारायण सप्ताहाचा आजचा पाचवा दिवस. या दिवशीच्या प्रवचन सेवेची संधी मला मिळाली आहे, हे माझे मोठे भाग्य. कारण योगायोगाने आजच श्रीरामनवमी आहे. म्हणजे प्रभू रामचंद्रांनी धरातली ज्या दिवशी अवतार धारण केला तो दिवस. सोप्या शब्दात जयंती! जन्मदिन! परंतु हे शब्द फारच तोकडे पडतात. कारण विश्वव्यापी परमात्म्याचा मानवी देह धारण करण्याचा दिवस हा 'अवतार' वा देहरूपाने प्रगट दिन असाच शब्दप्रयोग करणे अधिक योग्य होय.

तर सर्वव्यापी सर्वशक्तिमान परमेश्वरांनी आपल्या भव्यदिव्य कार्यासाठी म्हणजे जगदोद्धारासाठी ज्या दिवशी मानवी दिव्य देह धारण केला तो हा आजचा महान पवित्र दिवस म्हणजे श्रीराम नवमी होय. त्यानिमित्ताने आजच्या प्रवचनसेवेसाठी या श्रीमद् गीता–ज्ञानेश्वरीतील दहाव्या अध्यायातील ३१ व्या श्लोकाच्या पहिल्या चरणाचा उत्तरार्ध व त्यावरील माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या ओवी क्र. २५१ च्या ३ ऱ्या चरणापासून ओवी क्र. २५५ च्या दुसऱ्या चरणाअखेरपर्यंतच्या ओव्या निवडल्या आहेत. हे आपण आरंभीच ऐकलेत. यामध्ये भगवंतांनी आपल्या अगोदरच्या सातव्या अवतारातील आठवणी व दिव्य कार्य सांगितले आहे.

भक्तहो, जसे की आपण जाणताच, या श्रीमद् गीता ज्ञानेश्वरीचा दहावा अध्याय हा विभूती विस्तार योगाचा आहे. यामध्ये शूरवीर धनुर्धर महाभक्त पार्थाने भगवंतांना विचारल्यावरून भगवंत आपल्या विभूती सांगत आहेत. त्यांच्या विभूती अनंत आहेत. त्यातील प्रधान अशा ७५ विभूतींचा उल्लेख या अध्यायात भगवंतांनी केला आहे. भगवान श्रीकृष्णांचा

अवतार हा आठवा अवतार आहे. त्याआधीचा अवतार हा, अर्थातच सातवा आहे. कुरूक्षेत्राच्या रणांगणावर युद्धप्रसंगी, जे अजरामर दिव्य ज्ञान भगवंतांनी अर्जुनाला सांगितले, ते दिव्यज्ञान त्यांचीच एक विभूती, महर्षि व्यास यांनी ग्रंथित करून महाभारताच्या भीष्मपर्वामध्ये स्थापिले. त्याचेच नाव श्रीमद् भगवद्गीता होय. ही परमेश्वराची वाङ्मयीन मूर्तीच आहे. दहाव्या अध्यायाच्या ३१ व्या श्लोकाच्या पहिल्या चरणाच्या उत्तरार्धात भगवंत म्हणतात,

**रामः शस्त्रभृतामहम्।**

भगवान श्रीकृष्णांचाच आधुनिक अवतार संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज या उत्तरार्धाचा गुह्यार्थ उलगडताना म्हणतात,

**...शस्त्रधरां समस्तां। माजी श्रीराम तो मी।।२५१।।**

पहा महाराज, भगवान श्रीहरींनी अगदी स्पष्टपणे सांगितले आहे की सर्व शस्त्रधाऱ्यांमध्ये मी श्रीराम आहे. आपल्या 'श्रीराम' या विभूतीचा वैशिष्ट्यपूर्ण असा उल्लेख करतांना भगवंतांनी 'शस्त्रधारी श्रीराम' असे म्हटले आहे.

संत, सज्जन, ऋषी, महर्षि, सदाचारी, सत्पथावरून चालणारे, दुसऱ्यांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक असणारे, अखिल विश्वाचे कल्याण चिंतणारे अशा महान सत्पुरुषांचे काही चिरशत्रू असतात. त्यांना असे सदाचारी, दुसऱ्यांना सत्पथावर आणण्याचे कार्य करणारे लोक, त्यांचे शत्रू वाटत असतात. साधुत्वाचा अंश असणाऱ्या लोकांच्या सत्कार्यात असे उन्मत्त खलपुरुष हे नेहमी अडथळे उत्पन्न करीत असतात. सदाचरणाची भाषा अशा खलांना समजत नाही. असे दुष्ट साधुत्त्वाचा, चांगुलपणाचा मार्गच आपल्या दुराचारी वर्तनाने उद्ध्वस्त करतात. ते कोणाचेही चांगले विचार ऐकत नाहीत. आपल्या वाईट वर्तणूकीने सर्वांना त्रस्त करतात. काही वेळेला हे धर्मविध्वंसक उन्मत्त खलपुरुष अतिशय बलवान होतात. ते सर्व चांगल्या बाबींसाठी विनाशक होण्याची वेळ येवून ठेपते. त्यावेळी



'त्यांना समाप्त करणे' हा एकच मार्ग उरतो आणि अशा दुष्टांना समाप्त करणे हे सर्वसामान्य शूर विराचे काम उरत नाही तर प्रत्यक्ष सर्वशक्तिमान परमेश्वरासच 'अवतार' घ्यावा लागतो. खलांना फक्त शस्त्राचीच भाषा समजत असल्यामुळे परमेश्वरी अवतारास दिव्य शस्त्र धारण करावे लागते. त्यांचेशी युद्ध करावे लागते. भगवान श्रीविष्णूंनी श्रीराम रूपात जो अवतार धारण केला तो अशाच दुष्टनिर्दालन कार्यासाठी! त्यासाठीच त्यांना शस्त्र धारण करावे लागले. म्हणून माऊलींनी त्यांचा उल्लेख 'शस्त्रधरांमाजी श्रीराम तो मी' असा केला आहे. याच गीता-ज्ञानेश्वरीच्या चौथ्या अध्यायात आपल्या या जगात प्रगट होण्याचे, हेच सद्रक्षणाचे कारण सांगताना भगवंत म्हणतात,

**जे धर्मजात आघवे। युगायुगी म्या रक्षावे।**
**ऐसा ओघु हा स्वभावे। आद्य असे।।४९।।**

'धर्माच्या संपूर्ण स्वरूपाचे युगायुगत मी रक्षण करावे, असा हा अनुक्रम, जगाच्या आरंभापासूनच चालत आला आहे', असे सांगून अवतार धारण केल्यावर पुढे कोणते प्रमुख काम भगवंत करतात, ते सांगताना परमेश्वर श्रीहरी म्हणतात,

**दैत्यांची कुळे नाशी। साधूंचा मानु गिवसी।**
**धर्मासी नीतीशी। शेस भरी।।५३।।**

पहा भक्तहो, परमेश्वरी अवतारांचे दिव्य कार्य नीच, दुष्ट, आसुर, उन्मत्त, सर्व चांगल्या गोष्टींचे विरोधक व विध्वंसक अशा फक्त दैत्यांचाच नाश करून भगवंत थांबत नाहीत तर त्यांच्या कुळाचाच नाश ते करतात. नुसते दैत्य मारून कसे भागणार? त्यांच्या कुळात जन्मलेले व पुढे जन्मणारे, चांगल्यांचा नाश करीतच राहणार. यासाठी त्यांची कुळेच ते नष्ट करतात. त्यानंतर धर्म आणि नीती यांची सांगड घालून सुराज्याची स्थापना करतात. याच कार्यासाठी भगवंतांनी श्रीराम रुपाने अवतार घेतला.

अयोध्या नगरीचा, पुण्यशील, प्रतापशाली असा जो राजा दशरथ,

त्यांचा ज्येष्ठ सुपुत्र म्हणून श्रीराम प्रभूंनी आजच्याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध नवमीच्या या तिथीवर अयोध्येत जन्म घेतला. ते रामजन्म वर्णन करीत असताना भावार्थ रामायणात एकनाथ महाराज पुढील ओवीत म्हणतात,

**शुद्धसुमनी वसंत ऋतू। मधुमास अति विख्यातु।**
**शुक्ल पक्षु नवमी आतु। जन्म रघुनाथ पावला।।५।।**

**– भावार्थ रामायण, बालकांड, अ. ६ वा**

अशा रीतीने प्रभू रामचंद्रांचा अवतार पृथ्वीवर झाला. कौसल्या माता धन्य झाली. यथाकाळ सुमित्रास लक्ष्मण व कैकयीस भरत-शत्रुघ्न असे दोन पुत्र झाले. राजा दशरथ व राण्या कौसल्या, सुमीत्रा व कैकयी पुत्रमुखे पाहून आनंदाच्या परमोच्च स्थानावर पोहचले.

सेवेसाठी घेतलेल्या श्रीमद्गीता-ज्ञानेश्वरीतील ओवीत-माऊली ज्ञानेश्वर महाराज प्रभू रामचंद्रांची अवतार कार्य महती गाताना म्हणतात,

**जेणे साकडलिया धर्माचे कैवारे।**
**आपणपे करूनी धनुष्य दुसरे।**
**विजयलक्ष्मीये एक मोहरे। केले त्रेती।।**

ज्या प्रभू रामचंद्रांनी संकटात सापडलेल्या धर्माचा कैवार घेऊन जणू आपले स्वत:चेच किंवा स्वत:लाच दुसरे धनुष्य बनवून त्रेतायुगात विजय लक्ष्मीस आपल्या एकाकडेच वळविले.

सद्धर्म संकटात आल्याचा कैवार घेऊन स्वत:लाच दुसरे धनुष्य बनवण्याचा किती मार्मिक उल्लेख येथे श्रीरामांबाबत केला आहे. प्रभू रामचंद्रांचा हा अवतार त्रेता युगामधील असल्याचा उल्लेखही येथे आला आहे. कृत, त्रेता, द्वापार आणि कली अशी ही चार युगांची चौकडी आपल्याकडे मानली गेली आहे. त्यापैकी पहिली तीन युगे संपून गेली असून सध्या कलियुग चालू आहे. त्रेतायुगात प्रभू रामचंद्रांचा अवतार तर



द्वापार युगात भगवान श्रीकृष्णांचा अवतार. याच अवतारात भगवान स्वमुखाने श्रीराम प्रभूंच्या दिव्य कार्याचे म्हणजेच स्वकार्याचेच वर्णन त्रयस्थपणे करत आहेत. बाराव्या शतकात ज्ञानेश्वर माऊलींच्या रूपात प्रगटून ते हेच वर्णन श्रीमद् ज्ञानेश्वरीत करीत आहेत. भक्तहो, जसे की आपण जाणता 'रावणवध' याच प्रमुख कार्यासाठी प्रभू रामचंद्रांचा अवतार होता. परंतु तदनुषंगिक इतरही अनेक नराधमांचा खात्मा करून या धरेवरचा भार उतरायचा होता. केवळ दैत्य नव्हे तर त्यांच्या कुळांचाही नाश करायचा होता. सुधर्माची प्रस्थापना करायची होती.

एकवचनी, एकबाणी आणि एकपत्नी असे सदाचार शिरोमणी सर्वशक्तीमान श्रीरामप्रभूंचे वर्णन केले जाते. संत सज्जन ऋषीमुनींचे तारणहार आणि दुष्ट दुर्जनांचे कर्दन काळ असलेल्या प्रभूरामचंद्रांचे किती आणि कसे म्हणून गुणगान करावे? ज्यांच्या नामाच्या स्मरणाने पापांच्या अनंत राशी लयाला जाऊन पुण्याचे हिमालय उभे राहतात, अशा मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचे आजच्या त्यांच्या अवतारदिनी मनोमन स्मरण करूया. प्रभू श्रीराम हेच सर्वांचे आत्मारामही आहेत. तेच सर्वांच्या हृदयात विराजमान आहेत. नामस्मरण भक्तीने आपण त्यांना आळवूया. त्यांच्या अवतार कार्याचे गुणगाण गाऊया.

तर भक्तहो, जसे की श्री ज्ञानेश्वर माऊलींनी सेवेस घेतलेल्या ओवीत म्हटले आहे की, संकटात सापडलेल्या धर्माच्या कणवेने स्वत:लाच दुसरे धनुष्य करून त्रेतायुगात विजयलक्ष्मीस आपल्या एकाकडेच वळवले. ज्यांच्या विरुद्ध प्रभू रामचंद्र युद्धासाठी उभे राहिले, त्यात विरोधकांचा नाश झाला. म्हणजेच श्रीरामांचा विजय झाला. कोणत्याही युद्धात ते पराजित झाले नाहीत. म्हणून 'विजयलक्ष्मीये एक मोहरे' केले, असा सार्थ शब्दप्रयोग श्री ज्ञानेश्वर माऊली करतात. श्रीरामांचे अवतारकार्य प्रचंड आहे. आपण ते थोडक्यात स्मरूया.

श्रीगुरू वसिष्ठांनी त्यांचे व्रतबंधनादि केले. वेदाध्यायन, शास्त्रव्याख्यान, वेदांत आदि बाबींचे शिक्षण होताच त्यांनी सोळाव्या

वर्षी तिर्थयात्रा केली. अयोध्येस परतल्यावर, एके दिवशी महर्षि विश्वामित्र राजा दशरथांना भेटावयास आले. त्यांनी त्यांच्या यज्ञरक्षणासाठी श्रीरामांची मागणी दशरथांकडे केली. कारण मोठमोठे राक्षस त्यांच्या यज्ञाचा विध्वंस करीत असत. सांगता होऊ देत नसत. त्या राक्षसांपासून यज्ञाचे रक्षण करण्यासाठी विश्वामित्रांना प्रभू श्रीराम हवे होते. राजा दशरथांनी 'मुले अजून कुमार आहेत' असे सांगून श्रीरामांना त्यांचेबरोबर पाठवण्यास नकार दिला. श्रीराम मात्र जाण्यास उत्सुक होते. राजा दशरथांचा नकार ऐकताच विश्वामित्र भडकले. महर्षि वसिष्ठांनी समजावून सांगताच राजा दशरथांनी परवानगी दिली. लक्ष्मणही श्रीरामांबरोबर जाण्यास सज्ज झाला. दोघे बंधू विश्वामित्रांसमवेत निघाले.

वाटेत महाभयानक वन लागले. त्या वनात ताटिका नावाची राक्षसी राहत होती. ती महाभयंकर, आकाराने प्रचंड, ताकदवान, क्रूरकर्मी होती. भल्याभल्यांची संहारकर्ती होती. तिच्या आरोळीने प्राणीमात्रांचा थरकाप उडत असे. विश्वामित्रांनी ताटिकाची माहिती श्रीरामांना दिली व तिचा वध करण्याचीही आज्ञा दिली. तेवढ्यात आरोळी ठोकीत ताटिका तेथे आली. दोघे कोवळे कुमार पाहून त्यांना गिळण्यासाठी जिभळ्या चाटीतच ताटिका त्यांचेकडे धावली. सावधान असलेल्या प्रभू श्रीमरामांनी आपला अमोघ बाण तिच्यावर सोडला. भावार्थ रामायणात एकनाथ महाराज म्हणतात,

**कनाडी ओढिता आपण। आकर्षिला ताटिकेचा प्राण।**
**हृदयी आदळला बाण। जिव्हारी पूर्ण भेदला।।११६।।**

**बाणाच्या सबळ मेळी। ताटिका देओनी आरोळी।**
**नेटे आदळली भूतळी। न्याहा पाताळी उठिला।।११७।।**

हे प्रभू श्रीरामांचे खलनिर्दालनाचे पहिले कार्य होय. त्या राक्षसीच्या परिसरात प्राणीमात्रांचे जाणे म्हणजेच साक्षात तिच्या मुखात जाणे - म्हणजेच मृत्युच्या जबड्यात प्रवेशणे होय. तिच्या वधाने प्रभूंनी तो परिसर निर्भय केला. ऋषीमुनींनी दैवतांनी प्रभूंना धन्यवाद दिले.



त्यानंतर महर्षि विश्वामित्रांनी त्यांना विविध अस्त्रे प्रदान केली. विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण श्रीराम आणि लक्ष्मण करू लागले. यज्ञाचे विध्वंसन करण्याचे दुष्ट कृत्य करणे राक्षसांना अशक्य झाले. मारीच राक्षस पळून माघारी चालला असता त्याला बाणाच्या पिसाऱ्याने शंभर मैल दूर अंतरावर समुद्रावर उडविला. त्यानंतर त्यांनी सुबाहूचा वध केला.

**श्रीरामाचा निजबाण। सुबाहूचे निवटी मन।**
**चित्त बुद्धी अभिमान। छेदुनी संपूर्ण मारिला।।११७।।**

महर्षि विश्वामित्रांच्या यज्ञाची परिपूर्ती झाली. कुमार वयातच प्रभूंनी ताटिका-सुबाहू यांचेसह अनेक राक्षसांना यमसदनी धाडले. ऋषींची तप:स्थले निर्भय केली.

मिथिला नगरीला सीतास्वयंवरासाठी जाताना महर्षि गौतम ऋषींच्या आश्रमात शिलासदृश्य पडलेल्या अहिल्येचा उद्धार प्रभूंनी आपल्या पदस्पर्शाने केला. बघा महाराज, दगडसदृश्य व्यक्तीचासुद्धा उद्धार करण्याचे सामर्थ्य प्रभू श्रीरामांच्या चरणात होते, मग आपण तर जिते-जागते-चालते-बोलते मानव आहोत. एकनिष्ठ भक्तीने जर आपण प्रभू रामचंद्रांना भजले, तर आपला उद्धार का होणार नाही? आपणास परमगती का प्राप्त होणार नाही? जन्ममरणाच्या फेऱ्यातून आपली सुटका का होणार नाही?

मिथिला नगरीत सीतेच्या स्वयंवरासाठी तिच्या पित्याने म्हणजे जनकाने लावलेला पण आपणास ठाऊक आहेच. 'प्रचंड शिवधनुष्यास जो कोणी प्रत्यंचा लावील, त्यास राजकन्या सीता वरमाला घालील.' असा तो पण होता. कोणालाही ते धनुष्य उचलता आले नाही. शक्तीशाली रावण ते उचलण्याचा प्रयत्न करीत असताना भोवंडून खाली कोसळला. मग इतरांचा काय पाड? प्रभू श्रीरामचंद्रांनी मात्र ते शिवधनुष्य भक्तिभावाने नमस्कार करून लिलया उचलले आणि त्यास प्रत्यंचा लावण्याचा प्रयत्न करीत असताना 'कडाडऽऽ' असा प्रचंड आवाज होऊन ते धनुष्यच मोडले

गेले. सीता-श्रीराम विवाह झाला. उभयता म्हणजे पृथ्वीवरचे लक्ष्मीनारायण होतं. त्याबरोबर त्यांचे बंधू लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांचेही विवाह झाले. त्याचे वर्णन करताना भावार्थ रामायणात एकनाथ महाराजांनी म्हटले आहे.

**सीतेने वरिला श्रीरामचंद्र। उर्मिलेने वरिला सौमित्र।**
**मांडवीने वरिला भरतवीर। शत्रुघ्नशूर श्रुतकीर्तीने।।४७।।**

सर्वजण आयोध्येत परतले. त्यांची जीवनकालक्रमणा अयोध्येत चालू झाली. काही दिवसांनी भरत-शत्रुघ्नचा मामा युधाजीत अयोध्येत आला. आपल्या भाच्यांना आपला कैकय देश दाखवण्याच्या निमित्ताने, दशरथाच्या परवानगीने तो आपल्या देशास घेऊन गेला.

राजा दशरथाने श्रीरामांना राज्याभिषेकाची तयारी सुरू केली. त्यात कैकयीने, मंथरेच्या कारस्थानास बळी पडून, खोडा घातला. दशरथास, त्याने कैकयीस दिलेल्या दोन वरांची आठवण देऊन एका वराने भरतास राज्याभिषेक व दुसऱ्या वराने रामास चौदा वर्षे वनवास अशी मागणी केली. कचाट्यात सापडलेल्या राजा दशरथास आपल्या दोन वरासाठी, तिचे म्हणणे मान्य करणे भाग पडले. एकवचनी प्रभू श्रीरामांनी आपल्या पित्याच्या वचनासाठी वनवास स्विकारला. लक्ष्मण-सीता यांचेसह प्रभू वनवासाला गेले. कोळ्यांचा राजा गुहकाच्या आदरातिथ्याचा स्विकार करून ते भारद्वाज ऋषींच्या आश्रमात आले. त्यांच्याच सांगण्यावरून ते चित्रकूट पर्वताकडे प्रयाण करते झाले.

अयोध्येत मागे राजा दशरथ देह ठेवतात. भरत शत्रुघ्न परततात. भरत पराकोटीचा संतापतो. तो प्रभूंना परत अयोध्येस नेण्यास येतो. चित्रकूटपर्वतावर दोघा बंधूंची भेट होते. एकवचनी राम भरताचा प्रस्ताव मान्य करीत नाहीत. ते आपल्या चरणपादुका भरतास त्याच्या मागणीनुसार देतात. भरत अयोध्येत परततो. श्रीरामांच्या पादुका राजआसनावर स्थापित करून भरत नंदीग्रामला राहून अयोध्येचा राज्यकारभार पाहतो.



अरण्यातून अनेक ऋषी महर्षि तपस्वींची भेट घेत प्रभू श्रीराम पुढे जातात. वाटेत विराधाच्या रूपातील गंधर्वाचा उद्धार करतात. त्यांच्या भेटीसाठी देहत्याग रोखून धरलेल्या शरभंग ऋषींनी श्रीरामांचे दर्शन घडताच आपल्या योगसामर्थ्याने आत्मदहन केले. ते सत्यलोकास निघून गेले.

अगस्ती ऋषींच्या आश्रमात त्यांनी श्रीरामांना अनेक दिव्य अस्त्रे प्रदान केली. लक्ष्मण, सीता यांचेसह वनवासाची कालक्रमणा करता करता प्रभू श्रीराम पंचवटीस येऊन पोहचले. तेथे आश्रम बांधून कालक्रमणा करू लागले. रावणभगिनी शूर्पणखा तेथे आली असता ती प्रभू श्रीरामांच्या दिव्य रूपावर मोहित झाली. तिने सुंदर युवतीचे रूप घेऊन प्रभू श्रीरामास विवाहाची गळ घातली. प्रभू रामचंद्रांनी राक्षसीने केलेले वेषांतर ओळखले. ती सीतेवरही चालून जाऊ लागली. तेव्हा प्रभू रामचंद्रांनी लक्ष्मणाला आज्ञा केली की, हिचे नाक व ओठ कापून टाक. क्षणार्धात लक्ष्मणाने तिचे नाक, ओठ कापून टाकले. काही ठिकाणी ही कथा वेगळ्या रीतीने आली आहे.

खर व दूषण या आपल्या बंधूंकडे जाऊन शूर्पणखाने आपल्या अपमानाचे वृत्त सांगितले. चौदा हजार राक्षसांच्या प्रचंड सैन्यासह खर व दूषण श्रीराम लक्ष्मणावर धावून आले. आपल्या अमोघ बाणांनी त्या सर्वांचा संहार श्रीराम प्रभूंनी केला. त्या युद्धात फक्त शूर्पणखा जिवंत राहिली होती. तिचे दोन्ही कान लक्ष्मणाने कापून टाकले. शूर्पणखा लंकेस पळाली. तिने रावणास सारा वृत्तांत सांगितला. सीतेस त्याच्यासाठी अपहृत करण्यासाठीच ती गेली असता, तिची अशी अवस्था झाल्याचे त्या राक्षसीने आपला बंधू रावण यास सांगितले.

शूर्पणखा मुखातून श्रीरामांचा पराक्रम ऐकून रावणाने विचार केला की, श्रीरामास युद्धात हरवणे अवघड आहे, तेव्हा काही कपटकारस्थान करावे. त्यानुसार रावण जेथे मारीच होता, तेथे आला. सीताहरणाची योजना रावणाने मारीचाला सांगताच मारीच कमालीचा दचकला. गाठ

श्रीरामांशी असल्याचे त्याने रावणास सांगितले. यातून तुझे हित तर होणार नाहीच नाही, पण सर्वनाश मात्र होईल, असेही समजावले. कपटी रावणच तो. आपल्या नीच वर्तणूकीने त्रैलोक्यास पिडणाऱ्या त्या खलपुरुषांने मारीचालाच ठार मारण्याचा निश्चय जेव्हा बोलून दाखविला तेव्हा रावणाहातून मरण्यापेक्षा रामाहातून मेलेले श्रेयस्कर असा विचार मारीचाने केला. महर्षि वाल्मिकींचा मूळ श्लोक पहा,

**रामादपि च मर्त्यव्यं, मर्त्यव्यं रावणादपि**
**उभाभ्यामपि मर्तव्यं, वरं रामो न रावणं।।१५।।**

**– भा. रा. अ. का., अ १३, श्लोक १५**

श्रीराम हे साक्षात भगवंतांचे अवतार आहेत, हे त्या कपटी राक्षसानेदेखील ओळखले होते. त्यांच्या बाणाने आणि त्यांच्या नामस्मरणाने, कपटाने का होईना. पण अंती त्यांचे नाम मुखात असताना मृत्यु येणे हेसुद्धा सद्गतीस जाणे होईल, असे त्या मारीच राक्षसाने जाणले होते. म्हणून रावणाच्या कपट कारस्थानात तो सामील झाला. त्याने सुवर्ण मृगाचे रूप घेतले. श्रीरामांच्या आश्रमाच्या आसपास ते हरीण वावरू लागले. सीतामाईच्या दृष्टीस तो सुवर्णमृग पडला. तिला तो फार आवडला. 'तो सुवर्णमृग मला हवा!' असा हट्ट सीतेने श्रीरामांजवळ धरला. लक्ष्मणास सीतेचे रक्षण करण्यास सांगून श्रीराम त्या सुवर्णमृगाचा पाठलाग करू लागले. तो मायावी मृग दूर दूर पळू लागला. एका टप्प्यात अर्थातच एकाच बाणाने त्या सुवर्णमृगाचा वेध श्रीरामांनी घेतला. पडता पडता सुवर्णमृगाच्या मायावी रूपातील मारीच रामासारखा आवाज काढून ओरडला,

''हाय लक्ष्मणा, हाय सीता, धावा! धावा! घात झाला!!' आणि त्याने प्राण सोडला. अर्थातच माया नष्ट झाली. मारीचाचे मरण हे आणखी एका दुष्टाचे निर्दालन होय. पण तो अंती उत्तम गतीला गेला. कारण शेवटी त्याचे मुखी श्रीरामांचे नाम आले.



इकडे आश्रमात श्रीरामांच्या आवाजातील आर्त धावा ऐकून सीतेच्या हृदयाने ठाव सोडला. 'श्रीराम संकटात आहेत, त्यांच्या मदतीला जावा' असा हट्ट सीतेने लक्ष्मणाजवळ धरला. आपल्या वहिनीस लक्ष्मणाने परोपरीने समजावून सांगितले. पण सीतामाईने ते मानले नाही. अखेरीस एक रेखा आखून 'यापुढे जायचे नाही. ही रेखा ओलांडायची नाही,' असे निक्षून सांगून लक्ष्मण श्रीरामांच्या आलेल्या मायावी आवाजाच्या दिशेने निघाला.

तो जाताच दबा धरलेल्या बैरागी वेषातील रावणाने भिक्षा मागण्याच्या बहाण्याने सीतामाईस हाक दिली. सीतामाई भिक्षा वाढण्यासाठी त्या रेखेपर्यंत आली. पण तिने रेखा मात्र ओलांडली नाही. त्या रेखेच्या आत रावणाने प्रवेश करण्याचा प्रयत्न करताच अग्नीचे लोळ उठले. तेव्हा हरप्रकारे समजावून त्याने सीतामाईस रेखेबाहेर येऊन भिक्षा वाढवण्यास प्रवृत्त केले. रेषेबाहेर येताच रावणाने तिला उचलून आपल्या विमानात घातले आणि आकाशमार्गे तो लंकेकडे निघाला. अर्थातच भिक्षुचा वेष जाऊन रावण त्यावेळी मूळ रूपात प्रगटला होता. सीतामाईचा आरडा ओरडा सुरू झाला. लक्ष्मणाने आखलेली ती रेखा ओलांडण्यामुळे हा अनर्थ घडला. त्यावेळेपासून 'लक्ष्मण रेखा' हा शब्दप्रयोग रूढ झाला. एखाद्या कर्माची सीमारेषा ठरलेली असते. ती ओलांडताच अनर्थ घडतो. हे दर्शवण्यासाठी लक्ष्मण रेषा 'ओलांडू' नका असा इशारा दिला जातो. थोडक्यात मर्यादा ओलांडू नये असे म्हटले जाते.

पक्षिराज जटायूने, रावणास विमानातून सीतामाईचे अपहरण करून जाताना पाहिले आणि त्याने रावणावर हल्ला चढविला. त्याने रावणाशी तुंबळ युद्ध केले. पण प्रतापलंकेश्वराने जटायूचे पंख छाटले. जटायू जमिनीवर कोसळला. सीताहरणाच्या या प्रसंगी एका पक्षाने बलाढ्य रावणाशी झुंज दिली. त्याच्या तावडीतून सीतेस सोडवण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळातील घटना थोड्या आठवून पहा भक्तहो. एखाद्या स्त्रीचे अपहरण होत असले, तेही डोळ्यासमक्ष, तरीही मख्ख राहणारे

आजचे मानव कुठे आणि त्यावळेचा पक्षिराज जटायू, की ज्याने सीतामाईस सोडवण्यासाठी रावणाशी युद्ध करून आपला देह ठेवला, तो जटायू कुठे! एकूणच आज संवेदनक्षमता कमी होत चालल्याचे हे लक्षण आहे. आपल्याच परिसरात सत्य घडलेले एक उदाहरण आहे की, ज्या तरुणीने आरडाओरडा करूनही कोणी तिच्या मदतीस गेले नाही, पाहत राहिले.

लंकेत रावण-सीतेस अशोकवात ठेवतो. राक्षसींच्या पहाऱ्यात असलेल्या सीतेस तो आपल्याबरोबर विवाह करण्यासाठी वारंवार बजावतो व सीता त्याची निर्भत्सना करते. इकडे सीताशोध घेत दुःखमय श्रीराम व लक्ष्मण अरण्यातून जात असताना प्राण कंठाशी धरून राहिलेल्या जटायूशी त्यांची भेट होते. जटायू त्यांना रावणाने सीतेचे अपहरण केल्याची माहिती देऊन देह ठेवतो. जटायूच्या पार्थिवावर प्रभू श्रीरामांनी अंत्यसंस्कार केले. जटायूस उत्तम गती देऊन श्रीराम लक्ष्मणसह पुढे वाटचाल करू लागले.

वाटेत कबंध राक्षसाची भेट होते. तो शापित असतो. त्याच्या इच्छेनुसार श्रीराम त्याला अग्नी देतात. त्याबरोबर त्यास दिव्य देह प्राप्त होतो. 'सुग्रीवासी मैत्री करा' असा सल्ला देवून कबंध स्वस्थानी जातो. कबंध उद्धारानंतर श्रीरामांची पुढे वाटचाल होते. पंपासरोवर परिसरात भक्त शबरीचा आश्रम असतो. ती श्रीरामांचीच वाट पाहत असते. शबरीचा उद्धार करून श्रीराम बंधू लक्ष्मणासह पुढे जातात. ऋष्यमूक पर्वतावर प्रथम हनुमान-श्रीराम भेट होते. नंतर राज्यभ्रष्ट सुग्रीव व त्यांचे मंत्री नल-नील-जांबूवंत यांची भेट होते. आपल्या पत्नी व राज्याचे वालीने बलपूर्वक हरण केल्याची माहिती सुग्रीव प्रभू श्रीरामास देतो.

श्रीराम-सुग्रीव मैत्री होते. सुग्रीवाचा भाऊ वाली याने अधर्माने सुग्रीवाच्या पत्नीचे हरण केले होते. त्यास राज्य भ्रष्ट करून हाकलेले होते. वाली अतिबलाढ्य होता. त्यास पराजित करणे कोणालाही शक्य नव्हते. श्रीरामाने सुग्रीवास वचन दिले की, ते वालीचा वध करून सुग्रीवास राज्य प्रदान करतील. किष्किंधापती झाल्यावर श्रीरामांना



सीताशोधासाठी मदत करण्याचे आश्वासन सुग्रीवाने त्यांना दिले. त्यानुसार वालीस सुग्रीवाने युद्धाचे आव्हान दिले. समोरून वालीवध करणे अशक्य होते. त्यामुळे पहिल्या वेळी, सुग्रीव व वाली सारखेच दिसत असल्याने श्रीरामांना वालीस मारता आले नाही. दुसऱ्या वेळी सुग्रीवाच्या गळ्यात गजकमळांचा हार घातला. एका विशिष्ट क्षणी वालीने थोडे तर उड्डाण घेताच श्रीरामांच्या अचूक शरसंधानाने वालीच्या हृदयाचा वेध घेतला व तो खाली कोसळला. 'मी आपला अपराध केला नाही. युद्धासाठी समोर उभाही नव्हतो. अडून मला ठार मारण्याचा अपराध आपण का केला?' असा प्रश्न वालीने विचारताच श्रीरामांनी त्याला उत्तर दिले. ते महर्षि वाल्मिकींनी पुढील श्लोकात वर्णिले आहे,

**अद्य धर्ममधर्मं च जानासि त्वं कपिश्वर।**
**कृतं कर्म न जाणासी भ्रातृभार्यावमर्शन॥१४॥**

**– भा. रा. किका. अ. ६ वा, श्लोक १४**

'अधर्म करणाऱ्यांना अधर्माने संपवणे म्हणजेच धर्माचे पालन करणे होय.' असे सत्य श्रीरामांनी ठणकावून वालीस सांगितले. वालीस पश्चात्ताप झाला. त्याने अंगदास त्यांच्या पायावर घातले. अंगदाचे रक्षण करण्याचे वचनही श्रीरामांनी त्यास दिले. वालीस सद्गतीही दिली.

किष्किंधेवर पुन्हा सुग्रीवाचे राज्य स्थापित झाले. राजऐश्वर्योपभोगात गढून जाताच श्रीरामांच्या कार्याचा विसर सुग्रीवास पडला. लक्ष्मणाने त्यास सीताशोध कार्याचे स्मरण देताच सुग्रीवाने चहूदिशांना वानरसेना पाठवली. दक्षिणेकडे शोधार्थ गेलेल्या चमूत महाबली वीर हनुमानही होता. समुद्रतिरावर त्यांना जटायूचा भाऊ संपाती भेटला. त्याने स्वविद्येच्या जोरावर सीता रावणाच्या कैदेत बंदिस्त असल्याचे त्यांना सांगितले. अथांग समुद्र उल्लंघून पलिकडे जाण्याचा काहीतरी उपाय करण्याची आवश्यकता असल्याचे त्याने नील-नल-जांबुवंत व हनुमान यांना सांगितले. जांबुवंताने हनुमंतास स्वशक्तीची जाणीव देताच महाशक्तीशाली

हनुमानाच्या ठायी ती जागृतली आणि महाबली हनुमानाने लंकेच्या दिशेने उड्डाण केले. लंकेत अशोकवनात अशोकवृक्षाच्या खाली राक्षसींच्या पहाऱ्यात असलेल्या सीतेची भेट हनुमानाने घेतली व लवकरच प्रभू रामचंद्र लंकेत येऊन तुमची सुटका करतील, असे आश्वासन सीतेस दिले दिले.

नंतर हनुमानाने अशोकवन उद्ध्वस्त केले. रावणसभेत त्याने निर्भिड उत्तरे दिली. अंती रावणाच्या हुकुमानुसार हनुमानाच्या शेपटीस वस्त्रे बांधून ती पेटवून देण्यात आली. पेटत्या वस्त्रानिशी हनुमानाने उड्डाण केले व लंका जाळून टाकली, हे भक्तहो आपणास ज्ञात आहेच.

याठिकाणी श्रीरामभक्त बिभिषणाचा आदरपूर्वक उल्लेख केल्यावाचून राहवत नाही. रावणाचा बंधू बिभिषण याने हरप्रकारे रावणास समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. 'सीतामाईस परत कर. लंकेच्या आणि स्वत:च्या सर्वनाशापासून वाच.' परंतु रावणाने बिभिषणास हाकलून लावले. बिभिषणाने लंकात्याग केला.

वानरसेनेच्या सहाय्याने श्रीरामांनी समुद्र सेतू बांधला. त्यावरून सारे सैन्य समुद्र पार करून लंकेत पोहचले.

आपण सेवेसाठी घेतलेल्या माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या श्रीमद ज्ञानेश्वरीतील पुढील ओवीत ते म्हणतात,

**पाठी उभे ठाकुनी सुवेळी।**
**प्रताप लंकेश्वराच्या सिसाळी।**
**गगनी उदो म्हणतया हस्तबळी। दिधली भूता।२५३।।**

नंतर सुवेळ पर्वताच्या माथ्यावर उभे राहून प्रतापशाली लंकाधिपती जो रावण त्याच्या मस्तकांची ओळ आकाशामध्ये उधो उधो म्हणणाऱ्या पिशाश्च्यांच्या हातावर जणू बळी दिली.

महाराज, आतापर्यंत आपण धर्म संकटात आणणाऱ्या नराधमांना संपवीत लंकेच्या सुवेळ पर्वतापर्यंत पोहचलेल्या प्रभू रामचंद्रांच्या शौर्यशाली



कार्याचे अगदी संक्षिप्त रूपात स्मरण केले. त्याचबरोबर जागोजाग त्यांनी केलेल्या भक्तोद्धाराच्या घटनाही पाहिल्या. निबिड अरण्यात आत्मसाधना, तपश्चर्या, यज्ञकार्य करणाऱ्या ऋषीमहर्षिंना अभयी वातावरण प्रदान केल्याचेही पाहिले. आता ते त्यांच्या सगळ्यात मोठ्या कार्यासाठी लंकेत येऊन पोहचले आहेत. ज्या रावणाने आपल्या दुष्कृत्याने त्रैलोक्याला पिडले होते. देव-दानव-यक्ष-किन्नर आदिपैकी कोणीही ज्यास हरवू शकत नव्हते आणि ज्याचा उल्लेख माऊली ज्ञानेश्वर महाराज 'प्रताप लंकेश्वर' असा करताहेत, त्या कपटी, नीच राक्षसाला संपवण्यासाठी प्रभू श्रीराम सुवेळ पर्वतावर येऊन ठाकले होते. श्रीरामप्रभूंच्या अवतारातील मुख्य कार्य हेच होते की 'रावण वधणे!'

बलाढ्य रावण आणि त्याचे बलाढ्य साथीदार यांचा संहार करणे हे काम अतिशय कठीण होते. ज्या रावणाने देवांना अपमानित केले होते, त्या रावणाचा वध करून त्यांचा मान त्यांना मिळवून द्यायचा होता. प्रभू श्रीरामरूपात अवतीर्ण होण्याचे तेच प्रमुख कारण होते. सुवेळ पर्वतावरून श्रीरामांनी राजनीतीनुसार अंगदास शिष्टाईसाठी रावणाकडे धाडले. 'सीतामाईस सन्मानाने परत करून होणारा सर्वनाश टाळ,' अशा आशयाचा संदेश त्यांनी रावणास पाठविला. अर्थातच ती अंगदशिष्टाई रावणाने फेटाळून लावली व युद्धारंभाचा आदेश आपल्या सैन्यास दिला.

रामरावणाचे युद्ध कसे झाले. त्याचे उत्तर रामरावणासारखेच झाले. हे मी म्हणत नसून प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊलीच या, ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायात अन्य एका बाबीचा उल्लेख करताना म्हणतात,

**परि हे असो एथ ऐसे। राम रावण झुंजिन्नले कैसे?**
**राम रावण जैसे। मीनले समरी।।३८।।** (अ.१० वा.)

कारण त्यांच्यातील युद्धाला दुसऱ्या कशाचीही उपमा देऊन सांगता येणार नाही. त्यांनी एकमेकांवर जी शस्त्रास्त्रे सोडली, त्याचे नुसते वर्णन करायचे म्हटले तरी भरपूर वेळ लागेल. श्रीरामांनी आपल्या अमोघ

बाणाने रावणाचे मस्तक उडवले की, दुसरे मस्तक त्या ठिकाणी तयार होऊ लागले. अखेरीस प्रचंड अस्त्राने श्रीरामांनी रावणाच्या हृदयाचा वेध घेतला आणि रावण मृत होऊन खाली कोसळला. रावणवध झाला.

रावणवध होताच सर्वत्र आनंदीआनंद झाला. वानरसैन्यास तर अपरिमित आनंद झाला. देवादिकांना अजिंक्य असलेल्या रावणाचा वध झाल्याने यक्ष, गंधर्व-किन्नर, अप्सरा यांचे गायन, नर्तन सुरू झाले. स्वर्गात देवांनाही परमानंद झाला सेवेसाठी घेतलेल्या ओव्यात माऊली ज्ञानेश्वर महाराज पुढे म्हणतात,

**जेणे देवांचा मानु गिवसला। धर्मासी जिर्णोद्धार केला।**
**सूर्यवंशी उदेला। सूर्य जो का।।२५४।।**

रावणवधामुळे देवांचा मान त्यांचा त्यांना परत मिळवून दिला. स्वर्गातील देवांनीही श्रीरामांचा जयजयकार केला. का त्याचे वर्णन भावार्थ रामायणामध्ये युद्धकांडाच्या ६४ व्या अध्यायात अगदी समर्पकपणे आले आहे. कसे ते पहा,

**अंत:रिक्ष गगनीहुनी। प्रकट झाली आकाशवाणी।**
**राम विजयी रणांगणी। दशानन निवटीला।।४२।।**

**चिरंजिवी रघुनाथा। निवटोनिया लंकानाथा।**
**सुरा सोडविले समस्ता। बंदिमोचनता पै केली।।४३।।**

**तेणे सकळ सुरगण। आनंदमय होऊनी पूर्ण।**
**वर्णिती श्रीरामाचे गुण। दुष्ट दशानन निवटिला।।४४।।**

**जो अजेय त्रैलोक्यासी। बंदी घातले सुरवरांसी।**
**दासकाम घे आवेशी। भय मानसी असेना।।४५।।**

**ते दुष्ट सेवेपासुनी जाण। श्रीरामे सोडविले आपण।**
**मिळोनिया गंधर्वगण। करिती गायन आनंदे।।४६।।**



अशा प्रकारे खलनिर्दालन करून देवांचा मान देवांसी परत करण्याचे महान कार्य त्रेतायुगात श्रीरामप्रभूंनी केले. त्याचप्रमाणे जिर्ण झालेल्या धर्माचा जिर्णोद्धार करून त्यास पुन्हा सतेज, बळकट केले. लंकेत त्यांनी बिभीषणाचा राज्याभिषेक करण्याची आज्ञा लक्ष्मणास देताना म्हटले,

**सौमित्रा बंधु लक्ष्मणा। सत्वसंपन्न बिभीषणा।**
**करावोनिया मंगलस्नाना। सिंहासना अभिषेकी।।८३।।**

**- भा. रा. यु. कां. अ. ६६ वा.**

सात्त्विकास सत्तास्थानी स्थापून त्यांनी धर्मास कशी बळकटी दिली ते वरील ओवीत दिसून येते.

चौदा वर्षांचा वनवास संपवून आणि आपल्या अवतारकार्याचा महत्त्वाचा भाग आटोपून श्रीराम सीता, लक्ष्मणासह पुष्पक विमानातून अयोध्येस परतले. चौदा वर्षांपूर्वी भरतास दिलेल्या वचनानुसार त्यांनी राज्याभिषेक करवून घेतला. अयोध्येत प्रभू श्रीराम सिंहासनस्थ झाले. रामराज्यास सुरवात झाली. प्रजाजन आनंदी व सुखी झाले.

प्रभू श्रीराम हे सूर्यवंशात उदयाला आलेला जणू सूर्यच असा उल्लेख करून माऊली ज्ञोश्वर महाराजांनी श्रीरामांची स्तुती केली आहे. माऊली पुढे म्हणतात,

**तो हतियारू परजितया आतु।**
**रामचंद्र मी सीताकांतु...।।२५५।।**

दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी शस्त्र धारण करणाऱ्यांमध्ये सीतापती श्री रामचंद्र ही माझी विभूती आहे. आपला विभूती विस्तार सांगताना हे भगवंतांनी म्हटले. श्री ज्ञानेश्वर माऊलींनी श्रीरामप्रभूंच्या विभूतीबाबत सांगताना ज्या ओव्या प्रगट केल्या त्याआधारे आपण प्रभू श्रीरामांच्या पुण्यदायक अवतारकार्याचे, संक्षेपाने, आजच्या समयोचित दिनोचित अशा श्रीरामवमीच्या निमित्ताने स्मरण केले.

तर भक्तहो अशा रीतीने, श्रीरामप्रभूंनी वाईटांचा संहार करून धर्माची स्थापना केली. रामराज्य म्हणजेच सुराज्य! सुखाचे राज्य! आनंदाचे राज्य!

प्रभू श्रीराम आपल्या जीवनात नेहमी आनंद सुख समृद्धीचा वर्षाव करोत, अशी श्री रामप्रभू चरणी प्रार्थना करतो. वर्षानुवर्षे आपण मला आपल्या गावी प्रवचन सेवेसाठी आमंत्रित केले. भगवंतसेवेची संधी दिलीत, मला प्रेमादर दिलात, याबद्दल आपणास शतश: धन्यवाद देऊन मी, ह. भ. प. दिनकर आपणा उखळू ग्रामस्थांचा निरोप घेतो!

पुंडलिका वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम,
श्री गुरूदेव दत्त।

(उखळू, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर येथे श्री ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहांतर्गत बुधवार, दिनांक २४ मार्च, २०१० रोजी दिलेले प्रवचन)

❍❍❍